सामाजिक पर्यावरणामध्ये आवश्यक असणारी जी वैशिष्ट्ये तुम्ही निवडलेली आहेत ती कदाचित मानवी हक्काची मूलभूत प्रमाणके असतील.मानवी हक्कांचा पाया हा विश्वाच्या निर्मात्याने राष्ट्र, वंश, जमात, लिंग असा भेदभाव न करता संपूर्ण मानवजातीला सद्गुणशक्ती आणि गुणवत्तेची दिलेली देणगी होय.या देणगीच्या शक्यतांची पूर्तता करणे हाच मानवी अस्तित्वाचा हेतू आहे.१० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रकुल परिषदेने स्वीकारलेल्या आणि घोषित केलेल्या मानवी हक्काच्या सार्वत्रिकजाहीरनाम्यातील काही कलमांचे वाचन आणि चर्चा करून व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाच्या या अत्यंत महत्वाच्याबाजूचा हा घटक संपण्यापूर्वी आपण विचार करू. भारताच्या कायदा आणि घटनांध्ये या कलमाविषयी सुसंगत अशा तरतुदी असतील तर त्याचीही नोंद करा आणि कलमांचा प्रत्यक्ष अंगीकार आपल्या भागात कितीसा होतो याचाही शोध घ्या. या मानवी हक्कांचा आदर केला गेल्याने तळी उचलून धरल्याने जे सामाजिक पर्यावरण तयार होईल त्याचे चित्र रेखाटताना तुम्हांला खूपच आनंद आणि उल्हासित वाटेल यात कोणतीही शंका नाही. मानवी हक्काच्या या सार्वत्रिक जाहीरनाम्यामध्ये स्वाक्षरी करणाऱ्यांपैकी भारत एक देश आहे याचा तुम्हांला अभिमान वाटेल. यावर आधारित १९९३ चा मानवी हक्क संरक्षण कायदा म्हणतो: ‘‘मानवी हक्क आणि त्याच्या संरक्षणासाठी आणि त्याविषयीच्या सर्व बाबींचे मानवी हक्क न्यायालये, राज्य मानवी आयोग आणि राष्ट्रीय मानवी आयोग गठित करण्यात यावे.’’ (http://www.nhrc.nic.in).
खरे पाहता सर्व मानवी हक्क परस्परावलंबी आहेत आणि त्यांचा मानवी विकासाशी प्रत्यक्ष संबंध येतो. मानवी विकासासाठी काम करण्याकरिता मानवातील सुप्त क्षमतांची पूर्ण अभिव्यक्ती करणे आवश्यक आहे.

**कलम १** सर्व मनुष्यमात्रांना जन्मजात स्वातंत्र्य आणि समान प्रतिष्ठा व हक्क प्राप्त झालेले आहेत. त्यांना तारतम्य आणि सद्सद्विवेकबुद्धी आणि आंतरात्म्याची देन मिळालेली असते आणि त्यांनी परस्परांशी बंधुभावे व्यवहार केले पाहिजेत.

**कलम २** या अधिकारनाम्यात विहित असलेले सर्व अधिकार आणि स्वातंत्र्ये प्राप्त करण्याचा प्रत्येकाला हक्क आहे आणि याबाबतीत वंश, जात, रंग, लिंग, भाषा, धर्म, राजकीय किंवा इतर विचारप्रणाली, राष्ट्रीय वा सामाजिक स्थान, धनसंपत्ती, विशिष्ट कुळात जन्म वा इतर अशा कोणत्याही मर्यादान्वये भेदभाव केला जाणार नाही.
तसेच, कुठल्याही राजकीय, प्रशासकीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या राष्ट्रातील किंवा प्रदेशातील व्यक्तिमात्रांध्ये भेदभाव केला जाणार नाही मग ते राष्ट्र वा प्रदेश स्वतंत्र असो, वा सुरक्षित, स्वशासनरहीत असो अगर तेथे अन्य कोणत्याही प्रकारचे सार्वभौत्व असो.

**कलम ३** प्रत्येक व्यक्तीस जीवन, स्वाधीनता आणि वैयक्तिक सुरक्षेचा अधिकार आहे.

**कलम ४** कुणालाही गुलामी वा वेठबिगारीत ठेवले जाणार नाही. गुलामी प्रथा आणि कुठल्याही प्रकारातील गुलामांचा व्यापार निषिद्ध असेल.

**कलम ५** कुणालाही शारीरिक यातना दिल्या जाणार नाहीत आणि ना कुणाशी निर्दय, अमानुष व अपमानकारक व्यवहार वा शिक्षा केली जाईल.

**कलम ६** प्रत्येकास प्रत्येक ठिकाणच्या कायद्यासमोर व्यक्ती म्हणून उभे राहण्याचा अधिकार आहे.

**कलम ७** कायद्यासमोर सर्व समान आहेत आणि सर्वांना कुठल्याही भेदभावाविना कायद्यान्वये समान संरक्षणाचा हक्क आहे. या घोषणेचे उल्लंघन करून जर भेदभाव केला गेला अथवा अशा प्रकारच्या भेदभावासाठी जर काही प्रकारे उद्युक्त केले गेले तर त्या भेदभावाविरूद्ध समान संरक्षणाचा अधिकार सर्वांना प्राप्त आहे.

**कलम ८** कायद्याने अथवा संविधानानुसार प्राप्त झालेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाले असता प्रत्येकाल समुचित

राष्ट्रीय न्याय संस्थेकडून उचित उपाय मागण्याचा अधिकार आहे.

**कलम ९** कुणालाही जुलुाने कैद, स्थानबद्ध किंवा हद्दपार केले जाणार नाही.

**कलम १०** प्रत्येकाला त्याच्या अधिकार आणि कर्तव्यासंबंधाने अथवा त्याच्यावरील फौजदारी स्वरूपाच्या आरोपासंबंधाने न्यायोचित आणि सार्वजनिक सुनावणी, निरपेक्ष आणि नि:पक्ष न्यायसंस्थेपुढे होण्याचा अधिकार आहे.

**कलम ११** (१) प्रत्येक व्यक्ती, जिच्यावर दंडनीय अपराधाचा आरोप करण्यात आलेला आहे. तोवर, निरपराधी मानली जाईल जोवर आपल्या बचावासाठी आवश्यक अशा सोयी तिला निःपक्षपातातील न्यायालयात प्राप्त झालेल्या असतील आणि कायद्यासमोर तिला अपराधी म्हणून शाबीत केले नसेल.
(२) कोणतीही व्यक्ती कोणत्याही अशा कृत वा अकृत बाबीमुळे अशा दंडनीय अपराधाची अपराधी मानली जाणार नाही ज्याला त्या काळी प्रचलित राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार दंडनीय अपराध मानले गेले नसेल. आणि ज्या वेळेस तो दंडनीय अपराध केला गेला तेव्हा जेवढी दंडशिक्षा होत असेल त्यापेक्षा तिला अधिक दंड करता येणार नाही.

**कलम १२** कुठल्याही व्यक्तीची खाजगी बाब, परिवार, घर वा पत्रव्यवहार याबाबतीत कुणाचाही हस्तक्षेप खपविला जाणार नाही आणि तिचा सन्मान व ख्याती यावर कुठला आक्षेप घेता येणार नाही. असे हस्तक्षेप वा आक्षेपाविरूद्ध प्रत्येकाला कायदेशीर संरक्षणाचा अधिकार आहे.

**कलम १३** (१) प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक देशाच्या सीमांतर्गत स्वयं-पूर्णतेने येण्याचा, जाण्याचा अन् स्थायिक होण्याचा अधिकार आहे.
(२) प्रत्येक व्यक्तीला आपला वा परका कुठलाही देश सोडून आपल्या देशात परत यायचा हक्क आहे.

**कलम १४** (१) प्रत्येक व्यक्तीस त्रास होत असेल तर दुसऱ्या देशांध्ये आश्रय घेण्याचा आणि वास्तव्य याचा अधिकार आहे.
(२) प्रकरणांध्ये जे खरोखर गैर राजनैतीक अपराधांशी संबंधित आहेत वा जे संयुक्त राष्ट्राचे उद्देश आणि सिद्धांताच्या विरूद्ध आहेत. ह्या प्रकरणांध्ये हा अधिकार मिळणार नाही.

**कलम १५** (१) प्रत्येक व्यक्तीला नागरिकत्वाचा अधिकार आहे.
(२) कोणत्याही व्यक्तीला त्याच्या राष्ट्राच्या नागरिकतेपासून वंचित केले जाणार नाही वा आपल्या राष्ट्राचे नागरिकत्व बदलण्यापासून परावृत्त केले जाणार नाही.

**कलम १६** (१) सज्ञान वयाच्या स्त्री-पुरुषांना कुठलीही जात, राष्ट्रीयत्व वा धार्मिक मर्यादा आड न येता एकमेकांशी विवाह करून सहजीवनाचा अधिकार आहे. त्यांना विवाहाबाबत, वैवाहिक जीवनात आणि घटस्फोटाच्या बाबतीत समान अधिकार आहेत.
(२) विवाहाचा इरादा बाळगणाऱ्या स्त्री-पुरुषांचा संपूर्ण आणि स्वतंत्र सहमतीनुसारच विवाह होईल.
(३) कुटुंब हा समाजाचा नैसर्गिक आणि मूलभूत घटक आहे आणि त्याला समाज व राज्याकडून संरक्षण मिळविण्याचा अधिकार आहे.

**कलम १७** (१) प्रत्येकाला एकट्याने आणि इतरांसमवेत मालमत्ता बाळगण्याचा हक्क आहे.
(२) वाटेल त्या प्रकारे आपल्या मालमत्तेपासून कुणाला वंचित केले जाणार नाही.

**कलम १८** प्रत्येक व्यक्तीला विचार, बुद्धी आणि धार्मिक स्वातंत्र्य आहे. यानुसार आपला धर्म बदलण्याचा आणि एकट्याने वा इतरांसमवेत, तसेच सार्वजनिक रूपाने अथवा खाजगीपणे आपला धर्म पालन करण्याचा तसेच धार्मिक शिक्षण, आचार, उपासना यांतून आपल्या श्रद्धा प्रगट करण्याचा अधिकार आहे.

**कलम १९** प्रत्येक व्यक्तीला आपले मत आणि त्याच्या अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आहे. यात कुठल्याही हस्तक्षेपाविना मतस्वातंत्र्य बाळगण्याचा आणि कुठल्याही सीमा न लागू होता कोणत्याही माध्यमातून माहितीचा शोध घेणे, ती मिळविणे आणि ती माहिती व कल्पना देण्याचा हक्क आहे.

**कलम २०** (१) प्रत्येकाला शांतीपूर्ण सभा आणि बैठका घेण्याचा अधिकार आहे.
(२) कुठल्याही संस्थेचे सदस्यत्व कुणावरही लादले जाऊ शकत नाही.

**कलम २१** (१) प्रत्येकाला आपल्या देशाच्या शासनात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्याद्वारे भाग घेण्याचा अधिकार आहे.
(२) प्रत्येकाला आपल्या देशातील सार्वजनीक सुविधांचा लाभ घेण्याचा समान अधिकार आहे.
(३) जनतेच्या इच्छेवर शासन आधारलेले असेल. ही इच्छा वेळोवेळी आणि प्रत्यक्ष निवडणुकांतून प्रगट होईल. निवडणुका सार्वभौ आणि समान मताधिकाराद्वारे होतील आणि गुप्त मतदान वा अन्य समान स्वतंत्र मतदान प्रक्रियेनुसार घेतल्या जातील.

**कलम २२** समाजाच्या प्रत्येक सदस्याला सामाजिक सुरक्षिततेचा अधिकार आहे. प्रत्येकाला राष्ट्रीय प्रयत्न आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य तसेच प्रत्येक राज्यसंस्तेतील अनुकूल साधने, आत्मप्रतिष्ठा व आपल्या व्यक्तिमत्त्वाचा स्वतंत्र विकास यासाठी अनिवार्यतेने आवश्यक असलेले आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकार प्राप्त आहेत.

**कलम २३** (१) प्रत्येक व्यक्तीला काम करण्याचा, इच्छेनुसार रोजगार मिळविण्याचा आणि कामासाठी न्याय व सुविधा प्राप्त करण्याचा आणि बेकारीपासून संरक्षण असण्याचा अधिकार आहे.
(२) प्रत्येकाला समान कामासाठी कुठल्याही भेदभावाविना समान दाम मिळण्याचा हक्क आहे.
(३) काम करणाऱ्या प्रत्येक माणसाला योग्य आणि अनुकूल मजुरी मिळण्याचा अधिकार आहे. ज्यामुळे तो आणि त्याचे कुटुंब मानवी सन्मानाला उचित अशी उपजिविका करू शकतील आणि गरज पडल्यास त्याची पूर्ती इतर सामाजिक संरक्षणांद्वारे होईल.
(४) प्रत्येकाला व्यावसायिक संघटना निर्माण करण्याचा आणि त्यांचे सदस्य होण्याचा अधिकार आहे.

**कलम २४** प्रत्येक व्यक्तीला विश्रांती आणि सुट्टीचा अधिकार आहे. यात कामाचे योग्य तास आणि वेळोवेळी मिळणाऱ्या पगारी सुट्ट्यांचा समावेश आहे.

**कलम २५** (१) प्रत्येक व्यक्तीला, त्याला आणि त्याच्या कुटुंबाला आरोग्यदायी आणि कल्याणासाठी असा जीवनस्तर लाभण्याचा अधिकार आहे. यात अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सेवा आणि आवश्यक सामाजिक सेवा व बेकारीच्या काळातील सुरक्षेचा अधिकार, आजार, अपंगत्व, वैधव्य, वृद्धापकाळ, उपजिविकेचे साधन नसण्याचे, अशा परिस्थितीत संरक्षणाचा अधिकार आहे.
(२) मातृत्व व बालपण यांना विशेष काळजी व सहाय्यतेचा अधिकार आहे. वैवाहिक संबंधातून किंवा त्याशिवाय जन्मलेला अशा सर्व बालकांना हे सामाजिक संरक्षण प्राप्त असेल.

**कलम २६** (१) प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा अधिकार आहे. मूलभूत आणि प्राथमिक शिक्षण निःशुल्क असेल. प्राथमिक शिक्षण सक्तीचे असेल. व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षण सर्वसाधारणपणे उपलब्ध असेल आणि योग्यतेच्या आधारावर उच्च शिक्षणाची समान संधी सर्वांना मिळेल.
(२) शिक्षण हे मानवी व्यक्तिमत्वाच्या पूर्ण विकासाच्या दिशेने आणि मानवी अधिकार व मुलभूत स्वातंत्र्याबद्दलचा आदर बळकट करण्याच्या दिशेने असेल. शिक्षणातून सर्व राष्ट्रे, वंश व धार्मिक गट यांच्यामध्ये सामंजस्य, संहिष्णुता आणि मैत्री यांचा प्रसार व्हावा तसेच संयुक्त राष्ट्रांच्या शांती प्रस्थापणेच्या प्रयत्नांचाही प्रसार व्हावा.

(३) पालकांना आपल्या पाल्याला कोणत्या प्रकारचे शिक्षण द्यायचे हे निवडण्याचा अधिकार आहे.

**कलम २७** (१) प्रत्येकाला समाजातील सांस्कृतिक घडामोडीत भाग घेण्याचा, कलांचा आस्वाद घेण्याचा, तसेच वैज्ञानिक प्रगती आणि त्यापासून प्राप्त होणाऱ्या सुखसोयींचा लाभ घेण्याचा अधिकार आहे.
(२) प्रत्येक व्यक्तीला तिने निर्मिलेल्या वैज्ञानिक, साहित्यिक वा अन्य कलाकृतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या नैतिक आणि आर्थिक हिताची सुरक्षा करण्याचा अधिकार आहे.

**कलम २८** प्रत्येकाला या घोषणेत उल्लेखिलेले अधिकार आणि स्वातंत्र्य पूर्णतया साकार होऊ शकतील अशा सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय व्यवस्था प्राप्त होण्याचा अधिकार आहे.

**कलम २९** (१) प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व ज्या समाजात स्वातंत्र्याचा अनुभव घेऊ शकते आणि संपूर्ण विकास पावू शकते त्या समाजाप्रत त्याचे दायित्व आहे.
(२) आपले अधिकार आणि स्वातंत्र्य यांचा विनियोग करताना प्रत्येक व्यक्तीवर कायद्यानुसार केवळ तेवढीच बंधने राहतील. ज्यामुळे दुसऱ्याचे अधिकार आणि स्वातंत्र्य याबद्दल निश्चित जाणीव आणि योग्य आदर अबाधित राहील आणि लोकशाही समाजातील नैतिकता, लोक-प्रशासनव्यवस्था आणि सर्वसामान्यांचे कल्याण या न्याय अपेक्षा पूर्ण होतील.
(३) या अधिकारांचा आणि स्वातंत्र्याचा उपयोग कुठल्याही प्रकारे संयुक्त राष्ट्राचे सिद्धांत आणि उद्दिष्टे यांच्याविरूद्ध केला जाणार नाही.

**कलम ३०** या अधिकारनाम्यात उल्लेखिलेल्या कुठल्याही बाबतीत असा अन्वये काढणे अयोग्य ठरेल की ज्यापासून कुठलेही राज्य, गट किंवा व्यक्तीला इथे उल्लेखिलेले कुठलेही अधिकार वा स्वातंत्र्याचा नाश करण्याचे प्रयत्न वा अशा प्रयत्नात सामील होण्याचा अधिकार आहे.